





# ग्रामपंचायत गांजीभोयरे

ता. पारनेर, जि. अहमदनगर

| सौ. अनिता नारायण बाचकर | श्री. नरोडे एस.बी. | श्री. आनंदराव विठ्ठल झंजाड |
| --- | --- | --- |
| सरपंच | ग्रामविकास अधिकारी | उपसरपंच |

जा. क्र.

ग्रामपंचायत कार्यालय, गांजीभोयरे ता.पारनेर, जि.अहमदनगर

दिनांक : १६/०२/२०२२

**प्रति,**

**मा.कार्यकारी अभियंता साहेब**
**जिल्हा परिषद अहमदनगर**
**बांधकाम विभाग ( दक्षिण )**

**विषय :- मौजे गांजीभोयरे येथील गांजीभोयरे ते गडदवाडी रस्ता मुख्यमंत्री सडक योजना ( MMGSY ) अंतर्गत डांबरीकरण व खडीकरण होणेबाबत..**

**अर्जदार :- सरपंच/उपसरपंच ग्रामपंचायत गांजीभोयरे ता.पारनेर जि.अ.नगर**

**महोदय,**

वरील विषयानुसार मौजे गांजीभोयरे गावातील ग्रामस्थांच्या मागणीनुसार गांजीभोयरे ते गडदवाडी रस्ता रोजगार हमी योजने अंतर्गत ३ कि.मी पूर्ण झालेला आहे.तरी गांजीभोयरे व  गडदवाडी येथील ग्रामस्थांच्या दृष्टीने दळणवळणासाठी व गडदवाडी येथील विद्यार्थी शिक्षणासाठी गांजीभोयरे येथे येत आहेत.त्यांची गैर सोय होऊ नये म्हणून या रस्त्याचे मुख्यमंत्री सडक योजना ( MMGSY ) अंतर्गत डांबरीकरण व खडीकरण व्हावे हि विनंती.

**सोबत:- मासिक सभा ठराव प्रत**

| | |
| --- | --- |
| ग्रामसेवक | Zanjad A.V |
| ग्रामपचायत गांजी भोयरे | उपसरपंच |
| ता पारनेर, जि अहमदनगर | ग्रामपंचायत गांजी भोयरे |
| | ता पारनेर, जि अहमदनगर |

।। ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे ।।

।। झाडे लावा झाडे जगवा ।। समृध्द भारत बनवा ।। शौचालय ज्यांच्याघरी आरोग्य तेथे वास करी ।।



# ग्रामपंचायत गांजीभोयरे



ता. पारनेर, जि. अहमदनगर

| सौ. अनिता नारायण बाचकर | श्री. नरोडे एस.बी. | श्री. आनंदराव विठ्ठल झंजाड |
|---|---|---|
| सरपंच | ग्रामविकास अधिकारी | उपसरपंच |

जा. क्र.

ग्रामपंचायत कार्यालय, गांजीभोयरे
गांजीभोयरे
ता.पारनेर, जि.अहमदनगर

दिनांक : १६ / ०२ / २०२२

## मासिक सभा दि.१५/०२/२०२२

## ठराव क्र.०४ ची नक्कल

विषय क्र.४ :- मौजे गांजीभोयरे येथील गांजीभोयरे ते गडदवाडी रस्ता मुख्यमंत्री सडक योजना ( MMGSY ) अंतर्गत डांबरीकरण / खडीकरणास मंजुरी मिळणे बाबत..

ठराव क्र.४ :- आजच्या मासिक सभेत सरपंच सौ.अनिता नारायण बाचकर म्हणाल्या कि, गांजीभोयरे ते गडदवाडी हा रस्ता ३ कि.मी असून या रस्त्याचे काम रोजगार हमी योजनेतून पूर्ण झाले असून सदर रस्ता हा दोन्ही गावांच्या दळणवळणासाठी महत्वाचा असून गडदवाडी येथील विद्यार्थी शिक्षणासाठी गांजीभोयरे येथे येत असून हा रस्ता मुख्यमंत्री सडक योजना अंतर्गत झाल्यास विद्यार्थी तसेच दोन्ही गावच्या ग्रामस्थांची गैर सोय होणार नाही.तसेच या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात शेत जमीन असल्याने येथील शेतकर्यांना शिवार वाहतुकीसाठी हा रस्ता महत्वाचा आहे.

तरी यावर उपस्थित सर्व सदस्यांनी साधक बाधक चर्चा करून ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सूचक :- श्री.आनंदा विठ्ठल झंजाड

अनुमोदक :- श्री.प्रवीण बाळासाहेब खोडदे

ठराव सर्वानुमते मंजूर

| ग्रामसेवक<br>ग्रामपचायत गांजी भोयरे<br>ता पारनेर, जि अहमदनगर | Zanjad A.V.<br>उपसरपंच<br>ग्रामपंचायत गांजी भोयरे<br>ता पारनेर, जि अहमदनगर |
|---|---|

मास्क वापरा · हात स्वच्छ धुवा · सामाजिक अंतर ठेवा